# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १९/०८/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

### फसवणुक

**पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील मौजा काटेपांजरा गिट्टीखदान समोर येथे दिनांक २२/०७/२०२२ चे १७.०० वा. ते दिनांक २३/०७/२०२२ चे १५.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— तेजस सुभाश राठी, रा. ठवळेपुरा कोंढाळी त. काटोल जि. नागपुर याने www.obenev.com या साईटवर जाउन ईलेक्ट्रॉनिक मोटारसायकल खरेदी करीता केलेल्या पेमेन्टच्या व्यवहारात अज्ञात आरोपीने संगणकीय साधन मार्गाव्दारे तोतयागिरी करून ऑनलाईन एकुण २०,९९९/— रूपयाची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६(डी) माहिती तंत्रज्ञान अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री आचरेकर मो.क्र. ८३८००७२२११ हे करीत आहे.

### जबर दुखापत

**पो.स्टे. खापा** :— अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील मौजा वाकोडी येथे दिनांक १७/०८/२०२२ चे १९.३० वा. सुमारास आरोपी नामे— सारंग काशिनाथ कानोरकर, वय ३० वर्ष, रा. वाकोडी याने जुण्या भांडणाचे कारणावरून फिर्यादी नामे— वंसता मधुकर दोडके, वय ३८ वर्ष, रा.वाकोडी ता.सावनेर यास हातबुक्कीने मारहाण करून कॉलर पकडुन धडकल्याने फिर्यादी हा भिंतीवर पडुन त्याचे तोंडाला मार लागुन ५ दात पडले. फिर्यादी याचे मेडिकल कॉलेज नागपुर येथुन उपचाराचे कागदपत्रे पोस्टे. खापा येथे आणुन पेश केल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री मुकुंदा लोंदे मो.नं. ९८५०९००७६८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**